

# सिमरन---- आणि तिचा बिग- बिग- डऽडी, ---*दिवाकर कारखानिस !*



कोणी त्याला दादा म्हणतात,---- कोणी भाई म्हणतात, ----पण दिवाकर कारखानिसाला कुणी दिवा वा दिवाकर म्हटलेलं मी ऐकलेलं नाही--------हा दिवा डऽडी तर झालाच, पण पुढं बीग डऽडी आणि पांच वर्षांपूर्वी बिग बिग डऽडीही झाला!---------पणतीला नांव लाभलंय, -------<u>सिमरन</u>! ----किती सूंदर हंसरी छबी आहे तिची---पणजोबासारखीच!

भाईंचा जन्म विहारी नामक खेड्यांत झाला----विहार करणे म्हणजे सानंद फिरणे! भाईनी हा गुण जन्मताच अंगिकारला------

विहारी खापोलीच्या जवळ वसलेलं आहे ---कारखानिसांच्या विहारीतल्या विहिरीला तेरा मडकुळांची पानमोट लाभली------ तेरा भावंडं!----कारखानिसांच्या मळ्यात जणू जीवनाचं चैतन्य उदंड वाहत होतं--------घरातच गोकुळ होतं------बालपणीच, आईनं दिलेली, भाईंची स्वत:ची अशी तांबू नावाची गाय होती---तिथंच लाभली त्याना मातेची माया आणि दुधाच्या स्निग्धतेची साय------------करारी व कर्तृत्ववान आईवडिलांचे संस्कार हा त्याना लाभलेला डि एन ए चा ठेवा!---------त्यानी धरून ठेवलाय तो अंतरीचा ओलावा-----भाई सारं व सा-याना कमावतात, गमावत काहीच आणि कुणालाच नाहीत----

इथं मला माझ्या एका कवितेतल्या चार ओळी आठवतात-----------कवितेचं नाव आहे,---- अजूनही देंठ हिरवा!

*आयुष्यभर त्यानी खुलविली सत्वशील हिरवळ*
*सांवरली कळ,----वाढवलं आत्मबळ*
*धुक्या दंवातही अंग चैतन्यानं ओलावलं*
*ठेविला सोबतीला ओलावा,----हंसरा हिरवा!*

भाईंचं व्यक्तिमत्व असं ओलाव्यानं बहरलेलं आहे-----------

*जो जाणे तो जाणतो--------आत्मियता देहाची-----एकात्मता सर्वांची*
*जो खुलवी तो खुलवितो ------उत्फुल्लता अंतरीची-------स्नेहाच्या पुष्पांची*

भाईना अनेक साजेशा उपमा आपण देऊ शकतो-----------

*सागराच्या लाटांवर ते शुभ्रतेला फेंसाळीत आले---------*
*सुर्यकिरणां ना शतधनुंची कमान देत राहिले---------*

भाग्य भाईंचे,---------त्याना संसारात सोबत लाभली शमावहिनींची----------निर्हेतुक ईश्वरी उपासना------उदंड निर्लोभी प्रेम-----------सुखाची सावली-----अशी होती शमावहिनी उर्फ लिली!------

दुर्भाग्य हे की वहिनी नव्हेंबर १४, २००३ मध्ये गेल्या---------त्याचं दु:ख व्यक्त करताना *सिमरन* , ह्या त्यांच्या नव्या पुस्तकात, भाईनी माझ्या एका कवितेचा उल्लेख केलाय:

देहरूप तण ह्रदयी जपता
भान हरपले केव्हाचे
लीन जाहलो वृक्षासम मी
येण्या वादळ दु:खाचे

रंग न उरे संग हरवता
क्षितिजावरती उरे स्तब्धता
श्वानासम मी बसून राही
रोज तुझी गे वाट पाहता

रात्रीच्या गर्भात जागती
वटवाघुळे माझ्या दु:खाची
लोंबकळता मनात उलटी
तडफड होई ह्रदयाची

भाईनी वहिनीना जी अश्रुंची फुले वाहिली ती कधीही निर्माल्य होणार नाहीत------ते अंतिम प्रवासाला निघालेलं जहाज भाईंच्या क्षितिजावर दूरवर रेंगाळत आहे-----जीवनात लाभलेला आनंद, चिरंतन राहिलाय, भाईंच्या स्मरणात-------

*पुनवेच्या पिवळ्या चाफ्याचे-------रूप जे कोरले मनी*
*गंध मधूर तो आठवांतला -------- सुखवी, मोहरवी अजुनी*

वहिनी गेल्या तेव्हा येणा-या मृत्युचाही त्यानी अर्थ शोधला,--- इतरांची मृत्युविषयक भीती आणि अंतरीचा खेद सांवरण्यासाठी-----'काळाच्या पल्याड' ह्या छोटयाशा पुस्तिकेत ते म्हणतात,-----लिली जहाजातून मौल्यवान नेवैद्य घेऊन आली आणि देणा-या तृप्ततेत त्याच जहाजाला घेऊन दूर क्षितिजापल्याड जाण्या निघाली--------त्याचवेळी दुसरं एक जहाज बंदरात आलं---------

नांव असेल त्याचं, --- सिमरन!

असा, जीवनाची सार्थता पाहाणारा, हा सिमरनचा पणजोबा!

भाई हा माणूस बृहन मराठी आहे---- हा मराठी वृक्षावतार आहे-------अवतार (Avatar) सिनेमात पाहिलीत, तशी ह्याची पाळे, मुळांतच, सर्वत्र पसरलेली आहेत, मैत्रीची लागवड करीत--- त्यांच्या सहवासात कोणीही अनोळखी उरत नाही--------

भाईंच्यामुळे मला अनेक सुजन मित्र लाभले---- आणि ज्यांची मी त्याना ओळख करून दिली ते माझ्याहून त्यांच्या जास्त जवळ गेले!

असं का होते?

कारण त्यांचं हंसरं चैतन्य, ज्यांत जाणीव वाहते आपुलकीची------प्रत्येकाला अंतर्यामी मोकळं व्हायचं असतं, जीवनातल्या भरतीची त्याला ग्वाही हवी असते----दगदग विसरायची असते----भाईंचा ह्युस्टन ते हडपसर हा आनंदी - विहारी जीवनप्रवाह अजूनही वाहातोय-----ते विहार करीत आहेत, कसलीही दगदग न मानता----

कोण भाईना ओळखत नाही? कित्येक नामवंत आणी माझ्यासारखे निनावीही------सारे त्यांच्या पंक्तीत हंसतमूख होतात---------खरं म्हणजे नव्यांची ओळख करून घेणं हा त्यांचा नित्याचा ध्यास-------

'**सिमरन**' पुस्तकाला सौ सुनीता नागपूरकर ह्यांची प्रस्तावना आहे -----' सावली' दिवाळी अंकाच्या त्या सहसंपादिका------ गेल्या वर्षी मी त्याना पुण्यात भेटलो----सहज विचारलं, भाईंची- तुमची ओळख कशी झाली? म्हणाल्या,------काही नाही, एक दिवस असाच भटकत हा गृहस्थ आमच्या दारात आला------म्हणाला, मी दिवाकर कारखानिस!----

नागपूरकरांच्या शब्दांत सांगायचं तर दादा अनुभवांचं मोठ्ठालं भांडार आहे-------त्यानी जो आयुष्यांत आनंद वेंचला त्याचा '**सिमरन**' हा पुरावा आहे------हा त्यांच्या अनुभवांचा वसा ----ते विहारीलाच गवसणी घालीत बसले नाहीत,-----जगालाही घातली! प्रयत्नांची सतत जिद्द साकारली--- दुस-यांचा विश्वास कमवा, त्यांच्यावर विश्वास ठेवा, कृतज्ञ राहा------ ह्या बंधुभावाच्या बुरूजांवर त्यानी बांधलीय *बांधिलकीची* इमारत---- आपण आंत शिरतो

वास्तुपाठ घेण्या---त्यांचं हस्तीदंती हास्य कुणाला तसं दुखवत नाही---मात्र जे सुजन मनाना रुचण्यासारखं  नाही, त्यावर ते, कुणाचं नाव न घेता भाष्य वा उल्लेख करायला कचरत नाहीत---पण तरीही म्हणतात काही स्वभावांवर औषध नाही-------भाई विचारानी मागासलेले नाहीत----हे पाप, ते पुण्य असं सांगत नाहीत----श्रद्धेनं जगा एवढंच म्हणतात-----तुंम्हीच तुमचे सुधारक-------

अमेरिकेतल्या समाजाला ते सांगतात,------सूर्य आहे, पण उजाडलं नाही अशी आपल्या संस्थांची परिस्थिती आहे----मातेच्या उदरातून जन्माला आलेल्या मुलाची नाळ कापावी लागते----त्यानं आईचं प्रेम कमी होत नाही----भारतीय संस्कृती, दिवाळी समारंभासह ख्रिसमसचेही झाड उभे केल्यानं, बुडणार नाही-----होणारे बदल नवी पिढी आत्मसात करीत आहे----हे भवितव्य ध्यानी घ्या!

भाईंचे खास मित्र प्रमोद तेंडुलकर त्यांना पारिजातकाचे झाड मानतात---हा प्राजक्त मिश्किल मिशीखाली सतत बोलण्यात, हंसण्यात आणि लिहिण्यात गुंतलेला असतो,----- स्वस्थ बसत नाही!---- ह्युस्टनला गेला, तिथे 'स्नेह' मासिकाचे संपादन केले, नंतर 'सावली' हा दिवाळी अंक आणि वेब साईट!---- हा हंसरा गणपती सगळ्यांचा सुखकर्ता, दुखहर्ता झाला! भाईंची भाषाशैली सहजसूंदर शब्दांना अलंकार देणारी आहे--- अनंत काणेकराना त्यानी गुरू मानलंय-----भाईंची भाषा खेळकर आहे-----

भाई हा आपला एक समिश्र भौगोलिक इतिहासही आहे! भाईंची अपूर्वाई व्यापक आहे--- जिथे गेले, तिथे मराठी झेंडा घेऊन गेले----आधी युगांडा, नंतर न्युयार्क----लगेच तिथे मराठी मंडळे स्थापिली----सीकेपी स्नेहसहलींत सीकेपी मटनाची चटक अजूनही ते ज्ञातियाना देत राहिले आहेत-----खेडेगावातली गंमतधारी जत्रा ते सतत त्यांच्याभंवती भरवतात! त्यांच घर, इथं एअर इंडियानं येणा-या भारतियाना, आश्रयाचं स्थान झाले-----मी त्यांचा, मोकळ्या वेळातला, न्यूयार्क मधल्या क्वीन्स व्हिलेजातला शेजारी------

स्रर्वाना त्यानी 'सावली' दिली!

'परतीच्या वाटेवर!' ह्या त्यांच्या कथासंग्रहातून, भाईनी स्त्रियांच्या समस्यांवर भार दिला आहे----ते म्हणतात दोन स्त्रियानी माझं आयुष्य घडवलं-----एक माझी जन्मदात्री आणि दुसरी माझी पत्नी----- आईनं कृतज्ञता दिली, लिलीनं श्रद्धा------

जीवनातले अनेक आविष्कार त्यानी पाहिले, अनुभवले-----इतरांच्या सुखद:खात सामील झाले----वृद्धत्वाच्या धुक्यांतही त्यानी घराघरांच्या अंधुकतेत भिंतीपल्याड चाललेले कलह सोडवलेले आहेत-----'कशासाठी, पोटासाठी' म्हणत चाललेल्या गाडीच्या डब्याडब्यांतील बर्फावर ते जणू पाय रोवून प्रवास करीत आहेत--- सांगतात सा-याना, --- लेकांनो, नुसते नाहीसे होण्यासाठी जगू नका,----काहीतरी आठवणींचं सूख ठेवून जा------ भाईंच्या प्रत्येक कथेत आत्मबोधन आहे-----मनाची अवस्था आहे----सुखदु:खाचा  गवसलेला सूर आहे--- ' परतीच्या वाटेवर' मध्ये ते अखेरीला लिलीच्या अस्थी विसर्जनी हरीहरेश्वर समुद्रकिनारी गेले होते तेव्हा त्यांच्या पायाखाली वाळू भुरूभुरू सरकत होती, लाटा क्षितिजाकडे जात

होत्या, विसर्जनाची फुले पायाशी घोटाळत होती,------ तिथेच त्यानी दु:खाचा आवंढा गिळला,----- पुन्हा सानंदे जगण्यासाठी!

आता **सिमरन** विषयी------------Life Without Regrets! हे त्यानी पणतीशी आणि आपल्याशी केलेले हितगुज------ते म्हणतात आत्मचरित्र लिहिण्याइतकं त्यांच्याकडे मोठेपण नाही---पण अनुभवांची थैली आहे----आयुष्यांत केलेल्या भ्रमंतीची शिदोरी ते उघडतात----मी अमूक काही केलं असं आग्रहानं म्हणत नाहीत-----म्हणतात झालं ते असं-----पण त्यांची घडणावळ सोन्याची आहे--- त्यांत आईवडिलानी पेरलेले संस्कारिक हिरेमोती आहेत------ ही 'डी एन ए' ची सांखळी ते पणतीपर्यंत पोंहोचवीत आहेत, पुढे मागे ती मराठी शिकली तर---------पण त्यांच्या लेखनात उपदेशाचे डोस नाहीत-----हे आहे हितगुज! आपल्याशीही! जणू ते म्हणताहेत,

*ये हळूवार इथं-----बैस जरा जवळी----सांगतो हृद्य गुपिते----जी जीवनात जडली-------*

पण त्यांची सुबोध, रम्य आणि घरगुती भाषा खेळती आहे-----म्हणून मी आवरतं घेतो---- मात्र माझ्या क्लिष्टतेला आवरीत ' सिमरन' चा थोडासा आढावा घेणं आवश्यक आहे---- पुस्तकाच्या अनुक्रमणिकेत त्यानी, बालपण, संसार, मित्रवर्ग, व्यसन, ह्यांची ओळख दिलेली आहेच, पण क्षितिजावर वेळोवेळी आलेल्या संध्याछायांचीही चाहूल घेतलेली आहे-----त्यांत सुखदु:खाचे आभास आहेत----आपणही, त्यांच्यासारखाच, कोणतीही खंत न करता आयुष्याला उजाळा द्यायचा आहे------

**सिमरन** आहे भाईंची ' कहानी और सवाल!'--- जीवनाच्या चालत्या गाडीच्या बफर्सवर उभे राहून ते तुमच्या डब्यात डोकावीत आहेत, आस्थेनं विचारताहेत,----' क्या चल रहा है?'

भाई, तुमचं आयुष्य आणि मैत्री हा आम्हाला लाभलेला सुवर्णस्पर्श आहे-------- शंभरी नंतरही, --- जीते रहो! भाई, तुम्ही 'बिग-बिग-बिग डऽडी'ही व्हा!

विजय पाठारे
मार्च १३, २०१०

सिमरन--------
लेखक: दिवाकर कारखानिस
kdivakar22@yahoo.com
281-534-9733
281-635-3763
Tarang Prakashan
kothadiyatanmay04@gmail.com

Price US $7.00